**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतली घानाच्या राष्ट्राध्यक्षांची भेट (02 जुलै 2025)**

02 जुलै 2025

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज घानाचे महामहिम अध्यक्ष जॉन ड्रामानी महामा यांची भेट घेतली. ज्युबिली हाऊस येथे पंतप्रधानांचे आगमन होताच राष्ट्राध्यक्ष महामा यांनी त्यांचे स्वागत केले. गेल्या तीन दशकांतील भारतीय पंतप्रधानांची घानाला दिलेली पहिलीच औपचारिक भेट ठरली आहे.

2. उभय नेत्यांची विशेष आणि शिष्टमंडळ स्तरावर विस्तृत विषयांवर चर्चा पार पडली. त्यांनी सर्वसमावेशक भागीदारीत संबंध उन्नत करण्यावर सहमती दर्शविली. उभय नेत्यांनी भारत आणि घाना यांच्यातील मैत्रीपूर्ण आणि काळानुरुप विकसित होणाऱ्या संबंधांना पुन्हा एकदा अधोरेखित केले. व्यापार आणि गुंतवणूक, शेती, क्षमता बांधणी, डिजिटल तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा आणि नागरिक परस्पर संबंध यासारख्या प्रमुख क्षेत्रांमध्ये सहकार्य विस्ताराच्या मार्गांवर चर्चा केली. घानामध्ये वाढत्या द्विपक्षीय व्यापार आणि भारतीय गुंतवणुकीचे त्यांनी स्वागत केले. नेत्यांनी संरक्षण आणि सुरक्षा भागीदारी मजबूत करण्यावरही चर्चा केली. ते विशेषत: भारत-समर्थित पायाभूत सुविधा आणि क्षमता निर्माण प्रकल्पांद्वारे विकास सहकार्य भागीदारी अधिक मजबूत करण्यासाठी वचनबद्ध आहेत. भारताने आरोग्य, फार्मा, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, यूपीआय आणि कौशल्य विकासाच्या क्षेत्रात आपला अनुभव सामायिक करण्याची ऑफर दिली. पंतप्रधानांनी ग्लोबल साउथ विषयी असलेली भारताची वचनबद्धता अधोरेखित केली आणि या संदर्भात घानाच्या एकजुटीबद्दल आभार मानले. घाना मधील 15,000 भारतीय समुदायाची काळजी घेतल्याबद्दल पंतप्रधानांनी राष्ट्रपती महामा यांचे आभार मानले.

3. उभय नेत्यांची UN सुधारणांसह परस्पर स्वारस्याच्या जागतिक विषयांवर चर्चा पार पडली. पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर पाठिंबा आणि दृढतेसाठी पंतप्रधानांनी राष्ट्राध्यक्ष महामा यांचे आभार मानले. दहशतवादाविरोधात जागतिक लढाईला बळकटी देण्यास उभय बाजूंनी सहमती दर्शवली. घानाचे आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्थान विकसित होत असल्याबद्दल पंतप्रधानांनी घानाचे अभिनंदन केले. संयुक्त राष्ट्र मानव हक्क परिषदेतील घानाचा यशस्वी कार्यकाळ आणि राष्ट्रकुलचे महासचिव म्हणून घानाच्या परराष्ट्र मंत्र्यांची झालेली निवड या बाबींचा समावेश होतो. उभय नेत्यांनी लोकशाही मूल्ये, दक्षिण-दक्षिण सहकार्य आणि शाश्वत विकास आणि जागतिक शांतीसाठी सामायिक दृष्टीकोन यासाठी त्यांच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला.

4. शिष्टमंडळ चर्चेनंतर, संस्कृती, मानके, आयुर्वेद आणि पारंपारिक औषध आणि परराष्ट्र मंत्रालय यामधील सहभागासाठी संयुक्त आयोग यंत्रणा या क्षेत्रातील चार सामंजस्य करारांची देवाणघेवाण झाली. पंतप्रधानांच्या सन्मानार्थ राष्ट्राध्यक्ष महामा यांनी स्नेहभोजनाचे आयोजन केले होते. स्नेहपूर्ण

आदरातिथ्याबद्दल आभार मानत पंतप्रधानांनी राष्ट्राध्यक्ष महामा यांना परस्पर सोयीस्कर तारखेला भारत भेटीचे निमंत्रण दिले.

अक्रा

02 जुलै 2025